**<u>प्रेसनोट</u>** **दिनांक ०८/०२/२०२४**

## जबरी चोरी करणा-या आरोपीतांना अटक करून मालमत्ता हस्तगत केलेबाबत

दिनांक ०६/०२/२०२४ रोजी रात्री ११.३० वाजता दरम्यान गुड शेफर्ड चर्च, मच्छी मार्केट, चार बंगला, वर्सोवा, अंधेरी पश्चिम, मुंबई येथून फिर्यादी नामे श्री. जयप्रकाश राव रामसरे गुप्ता वय २१ वर्षे हे मोबाईल फोन वर बोलत चालत जात असताना एका मोटार सायकल वरून दोन अनोळखी इसम येवून त्याच्यापैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांच्या हातातील रू. १५,०००/- किमतीची आयफोन ११ मोबाईल फोन जबरदस्तीने खेचुन चोरी केला व पळुन गेले. म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दोन अनोळखी इसमांविरूध्द वर्सोवा पोलीस ठाणे गु.र.क्र.८३/२०२४, कलम ३९२, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयांच्या आजपावेतो केलेल्या तपासावरून आरोपी १) विजय पिंटू मोरे, वय २२ वर्षे व २) राकेश सत्तू शहा वय २२ वर्षे यांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झालेने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून आरोपीतांकडून जबरी चोरी केलेला रू. १५,०००/- किमतीची आयफोन ११ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयाचे तपासादरम्यान अटक आरोपीतांनी जुहू पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १३३/२०२४, कलम ३७९ भा.दं.वि., अंबोली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६०/२०२४, कलम ३७९, ३४ भा.दं.वि., गु.र. क्र. १६५/२०२४, कलम ३७९ भा.दं.वि., दा.नौ. नगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५३/२०२४, कलम ३७९ भा.दं.वि. हे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले असून नमूद सर्व गुन्हयातील चोरीचा मालमत्ता अनुक्रमे विवो कंपनीचा मोबाईल अंदाजे किमंत रू. १५,०००/-, आयफोन १३ मोबाईल अंदाजे किमंत रू. २५,०००/-, होंडा मोटार सायकल अंदाजे किमंत रू. २०,०००/- , बजाज पल्सर मोटार सायकल अंदाजे किमंत रू. २५,०००/- हस्तगत करण्यात आली आहे. अशाप्रकारे पाच गुन्हे उघकीस आणून एकूण १,००,०००/- रूपये किमंतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास चालू आहे.

वर्सोवा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो. उपनि. श्री. ज्ञानेश्वर जाधव, पो. शि.श्री.गोसावी, पो.शि. श्री. रकटे, पो.शि. श्री.किंजळकर, पो.शि. श्री.थोरात, पो.ह. श्री. गणेश हंचनाळे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

--------००-------